# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २७.०६.२०२६

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि.२६/०६/२०२६ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १६२ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,०७,७५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२६/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०७ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ५४८०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या गौण खनिज वाळुचे उत्खन्नन सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या गौण खनिज वाळुचे उत्खन्नन अंतर्गत दि. २६/०६/२०२६ रोजी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनीयम अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये पोस्टे कुरूंदा येथे ०१ ठिकाणी यातील आरोपी हे त्याचे आर्थिक फायदयासाठी सदर टिप्पर मध्ये अवैध रित्या गौण खनिज वाळु उत्खनन करून वाहतुक करत चोरून विक्री करण्यासाठी घेवुन जात असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल करून एकुण १९,०५,०००/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.